विशेष सहाय्य योजनेच्या निकषात
सुधारणा करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक : विसयो-२०२५/प्र.क्र.९२/विसयो**
**मंत्रालय, मुंबई-०३२ ४००**
**दिनांक: १४ ऑक्टोबर, २०२६.**

वाचा :-

१. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-२०१८/प्र.क्र.६२/ विसयो, दिनांक २०.०८.२०१९,
२. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-२०२०/प्र.क्र.१००/ विसयो, दिनांक ०३.०५.२०२१.
३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-२०२२/प्र.क्र.८७/ विसयो, दिनांक २२.०६.२०२३.
४. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-२०२२/प्र.क्र.१२०/ विसयो, दिनांक ०५.०७.२०२३.
५. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. विसयो-२०२५/प्र.क्र.९२/ विसयो, दिनांक २७.०३.२०२६.

**शासन निर्णय-:-**

राज्यात विशेष सहाय्य योजनांतर्गत राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजना आणि केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना व इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्तीवेतन योजना या योजना राबविण्यात येतात. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गतच्या विशेष सहाय्य योजनेतील संदर्भ क्र.१ व २ येथील शासन निर्णयातील निकष, अटी व शर्ती यामध्ये विभागाच्या उपरोक्त संदर्भ क्र.५ येथील शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत.

आता, विभागाच्या दिनांक २७.०३.२०२६ रोजीच्या शासन निर्णयातील निकष, अटी व शर्ती यामध्ये सुधारणा करण्यासाठी विविध लोकप्रतिनिधी तसेच योजनेतील लाभार्थी यांचेकडून निवेदने प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने मा.मंत्री (विशेष सहाय्य) महोदयांकडे दि. २५/०८/२०२६ रोजी बैठक आयोजित करुन त्यावर चर्चा करण्यात आली. यासंदर्भात विविध लोकप्रतिनिधी तसेच लाभार्थ्यांची मागणी विचारात घेऊन शासन निर्णयातील तरतुदींमध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :-

२. **विशेष सहाय्य योजनेच्या पात्रतेसाठी खालील कागदपत्रे आवश्यक राहतील :-**

| अ.क्र. | | अर्जदाराचा तपशील |
|---|---|---|
| १ | ओळखीचा पुरावा | १. अर्जदाराचे आधारकार्ड |
| २ | अर्जदाराचा पत्ता | १. रहिवाशी दाखला (ग्रामपंचायत) **किंवा** रेशन कार्ड |

| | | |
|---|---|---|
| ३ | अर्जदाराचा वयाचा पुरावा | १. **अर्जदाराचे आधारकार्ड** हे वयाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात यावे. आधारकार्डवर पूर्ण जन्मतारीख उपलब्ध नसल्यास वयाचा पुरावा म्हणून जन्म प्रमाणपत्र **किंवा** शाळा सोडल्याचा दाखला ग्राह्य धरण्यात यावा. |
| ४ | अर्जदाराचा उत्पन्नाचा पुरावा | १. उत्पन्नाचे प्रमाणपत्र (तहसिलदार) **किंवा** दारिद्र्यरेषेखालील प्रमाणपत्र (केंद्र पुरस्कृत योजनांसाठी) **किंवा** पॅनकार्ड **किंवा** २६ ए.एस.नमुना यापैकी एक अर्जदाराचा उत्पन्नाचा पुरावा म्हणून ग्राह्य धरण्यात यावा. |
| ५ | पात्रतेबाबत पुरावे | १. **विधवा महिलांबाबत :-** पतीचे मृत्यु प्रमाणपत्र.<br>२. **घटस्फोट झालेल्या महिला :-** मा.न्यायालयीन आदेशाची प्रत.<br>३. **अनाथ असल्याचा दाखला :-** ग्राम महसूल अधिकारी व ग्रामसेवक यांची संयुक्त स्वाक्षरीने दिलेला साक्षांकित दाखला **किंवा** मुख्याधिकारी **किंवा** प्रभाग अधिकारी **किंवा** प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बालविकास सेवा योजना यांनी साक्षांकित केलेला दाखला.<br>४. **तृतीयपंथी :-** जिल्हाधिकारी **किंवा** जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिलेले प्रमाणपत्र. |

३. उपरोक्त वाचा येथील संदर्भ क्र.१ ते ५ येथील शासन निर्णयान्वये विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांकडून दरवर्षी घेण्यात येणारे हयात प्रमाणपत्र सादर करण्याबाबत विविध तरतूदी करण्यात आलेल्या आहेत. तसेच ०७ मे, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजनेतील पात्र लाभार्थ्यांकरिता केंद्र शासनाच्या धर्तीवर BSA (Beneficiary Satyapan App) या प्रणालीचा वापर करुन हयात प्रमाणपत्र (Digital Life Certificate) ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याबाबत शासनाने आवश्यक मार्गदर्शक सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांनी सदर कालावधीत हयात असल्याबाबत प्रमाणपत्र ऑनलाईन पद्धतीने सादर करणे आवश्यक आहे. तथापि, ज्या लाभार्थ्यांना केवळ तांत्रिक कारणांमुळे ऑनलाईन पद्धतीने हयात प्रमाणपत्र सादर करणे शक्य होणार नाही, केवळ अशाच लाभार्थ्यांचे हयात प्रमाणपत्र ऑफलाईन पद्धतीने स्वीकारण्यात यावेत.

विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांनी विहीत कालावधीत हयात प्रमाणपत्र सादर न केल्यास लाभार्थ्यांना विशेष सहाय्य योजनेचा लाभ बंद करण्यात यावा. तसेच विशेष सहाय्य योजनेतील पात्र लाभार्थ्यांनी विहीत कालावधी नंतर हयात प्रमाणपत्र सादर केल्यास प्रकरणातील अपरिहार्य/अपवादात्मक परिस्थिती विचारात घेऊन लाभार्थ्यांचे बंद केलेले अर्थसहाय्याचे वाटप हयात प्रमाणपत्र सादर केल्याच्या दिनांकाच्या पुढील महिन्यापासून पूर्ववत करण्यात यावे.

४. राज्य पुरस्कृत संजय गांधी निराधार अनुदान योजना व श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना या योजना आणि केंद्र शासनाच्या इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ निवृत्तीवेतन योजना व

इंदिरा गांधी राष्ट्रीय विधवा निवृत्ती वेतन योजना या योजनांकरिता उर्वरीत पात्रतेसाठीचे निकष, अटी व शर्ती संदर्भ क्रमांक १ ते ५ येथील शासन निर्णयाप्रमाणे राहतील.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६१०१४१९०८०८२९२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VIVEK RAMESH SHINDE

Digitally signed by VIVEK RAMESH SHINDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA, 2.5.4.20=98222E73B61528CEE875E0CAB75E02437703C36592147 9FB0198FCF43D79D224, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=3D2F2D59501068679DD214122D63CB4D2D18B7 6F5A89CAE6ECA0162AE6701444, cn=VIVEK RAMESH SHINDE
Date: 2026.10.14 19:09:13 +05'30'

( विवेक शिंदे )

**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव/ सचिव.
३. मा. उपमुख्यमंत्र्याचे प्रधान सचिव/ सचिव.
४. मा.मंत्री, विशेष सहाय्य यांचे खाजगी सचिव.
५. सर्व जिल्ह्यांचे पालक मंत्री,
६. सर्व मंत्र्यांचे खाजगी सचिव,
७. सर्व राज्यमंत्र्यांचे खाजगी सचिव,
८. सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष,
९. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
१०. महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परिक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
११. सचिव, ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार, कृषि भवन, नवी दिल्ली,
१२. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
१३. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई,
१४. संचालक, नागरी प्रशासन, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई,
१५. संचालक, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित, मुंबई
१६. वित्त विभाग (व्यय-१४ / अर्थसंकल्प-७), मंत्रालय, मुंबई,
१७. सर्व मंत्रालयीन विभाग/सर्व विभागीय आयुक्त /सर्व महापालिका आयुक्त/सर्व पोलीस आयुक्त,
१८. सर्व जिल्हाधिकारी / सर्व जिल्हा पोलीस अधीक्षक / सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
२०. संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,
२१. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२२. विभागीय समाजकल्याण अधिकारी ( मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर)
२३. सर्व उप विभागीय अधिकारी/उप जिल्हाधिकारी (प्रांत अधिकारी) / सर्व तहसिलदार,
२४. सर्व कोषागार अधिकारी / सर्व उप कोषागार अधिकारी,
२५. सर्व पंचायत समितीचे गट विकास अधिकारी,
२६. सर्व अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई,
२७. निवड नस्ती, विसयो.